वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी, गट अ (कनिष्ठ) या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१९/६८/प्र.क्र.४०/३४-अ,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
तारीख: ८ जुलै, २०१९

शासन निर्णय :-

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील सहायक संचालक (माहिती)/ माहिती अधिकारी/ अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने, गट-ब (वेतन श्रेणी एस -१५ : ४१८००-१३२३००) संवर्गात कार्यरत असलेल्या खालील अधिकाऱ्यांना वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी, गट अ (कनिष्ठ) (वेतन श्रेणी एस- १८ : ४९१००-१५५८००) या पदावर खालील अटींच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात येत असून कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांची रकाना (४) येथे त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व वर्तमान पदनाम	ज्येष्ठतेनुसार प्रवर्ग	पदोन्नतीचा प्रवर्ग	पदोन्नतीने पदस्थापनेचे ठिकाण, महसूली विभाग व नियुक्तीचा जिल्हा
१	२	३	३	४
१	श्री. मिलिंद दुसाने	इ.मा.व.	खुला	जिल्हा माहिती अधिकारी, अकोला
२	श्रीमती क्रिती लाला	खुला	खुला	जिल्हा माहिती अधिकारी, जालना

अटी व शर्ती :-

१) वरील अधिकाऱ्यांना वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)/ जिल्हा माहिती अधिकारी/ वरिष्ठ उपसंपादक/ जनसंपर्क अधिकारी, गट अ (कनिष्ठ) या पदावरील पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निकालाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) सदर पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या पदोन्नतीच्या परिणामी उपरोक्त अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाजेष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

२. वरील अधिकाऱ्यांनी पदोन्नतीच्या पदावर पदग्रहण केल्यापासून १ महिन्याच्या आत वेतननिश्चितीचा विकल्प द्यावा. असा विकल्प विहित मुदतीत न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११ (१) (ए) अनुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०७०८१६३४२९२७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2019.07.08 16:45:07 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (मावज), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व परिक्षा), मुंबई / नागपूर,
५. संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती)(वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. संचालक (माहिती), नागपूर-अमरावती विभाग, नागपूर,
८. संचालक (माहिती), मराठवाडा विभाग, औरंगाबाद,
९. उप संचालक (माहिती), कोकण विभाग, नवी मुंबई,
१०. उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
११. जिल्हा माहिती अधिकारी, रायगड / अकोला / जालना,
१२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड / अकोला / जालना,
१४. अधिपरिक्षक, पुस्तके व प्रकाशने, मुंबई,
१५. संबंधित अधिकारी (मावज मार्फत),
१६. निवडनस्ती.